# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/02/2024 (बुधवार) सकाळ

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत टेंबरी चौक येथे दिनांक १२/०२/२०२४ चे ०८.३० वा. दरम्यान **आरोपी नामे– मकसुद टायगर मुस्ताख शेख, वय ३० वर्ष, रा. ड्रीम वन कॉलनी, पुरनलाल स्कुल जवळ बुट्टीबोरी जि. नागपूर** याने जुन्या वादावरून संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून फिर्यादी सोबत वाद विवाद करून नुडल बनविण्याचा डोंगा मोठा चमचा फिर्यादीला जिवे मारण्याच्या इरादयाने डोक्यावर मारला परंतु फिर्यादीने डोक्यावरला डोंगा वाचविला पुन्हा आरोपीतांनी फिर्यादीच्या छातीवर जिव घेण्याच्या इरादयाने तो डोंगा छातीवर व हाताला लागून दुखापत झाली. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मोहम्मद अकलीम मोहम्मद असलम शेख, वय ३५ वर्षे रा. रूईखैरी बुट्टीबोरी ता. जि. नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपींविरुध्द कलम ३०७, ५०४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदरचा गुन्हा दाखल होताच ठाणेदार एमआयडीसी यांनी वेगवेगळे पथक तयार करून आरोपीचा कसोशीने शोध घेतल्याने आरोपीला तात्काळ ताब्यात घेण्यात पोलीसांना यश आले. पुढील तपास सपोनि. भुजबळ मो. नं. ९९२२६०९११९ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राजीव कर्मलवार, भुजबळ व त्यांचे टीमने पार पाडली.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ यांनी पोलीस स्टेशन कुही परीसरातील अवैध धंदयावर रेडकामी पेट्रोलींग करीत असतांना विश्वसनीय मुखबीर द्वारे खबर मिळाली की, कुही कडुन पाचगाव गावाकडे येणाऱ्या रोडनी रेती भरलेला १० चक्का टिप्पर येत आहे यावरून पाचगाव कडे जाणा–या आकोली पुलीयाचे रोडवर नाकांबदी केली असता दि. १३/०२/२०२४ चे २३.३० वा. दरम्यान कुही कडून पाचगावकडे जाणाऱ्या मौजा आकोली गावाजवळील पुलीया जवळ १० चक्का टिप्पर क्र. MH 40 BF 4824 येतांनी दिसले. त्यास नाकाबंदी दरम्यान थाबवुन टिप्परची पाहणी केली असता सदर टिप्परमध्ये रेती भरलेली दिसून आल्याने टिप्पर मधील असलेल्या चालकास त्याचे नाव गाव व पत्ता विचारले असता त्यानी आपले नाव १) दर्शन शंभुजी रामटेके, वय २१ वर्ष रा. पाचगांव ता. उमरेड जि. नागपुर, क्लिनर नामे– २) अनुराग राजकुमार पंढरे वय १९ वर्ष रा. नवेगाव पोस्ट सालई ता. उमरेड जि. नागपुर, असे सांगीतल्याने त्यावरून त्यांना रेती व वाहतुकीचा परवाना विचारले असता रेतीचा कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याचे सांगीतले. सदर टिप्परमधील रेती कोठुन आणले याबाबत विचारणा असता सदरची रेती हि पवनी जि. भंडारा येथील नांदेळ घाटावरून रेती आणल्याचे सांगीतले. आरोपीतांकडुन १० चक्का टिप्पर क्र. MH 40 BF 4824 कि. ३०,००,०००/–रू. टिप्पर मध्ये विना परवाना ०६ ब्रास रेती ३०,०००/– रू. असा एकूण ३०,३०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, ३४ भादवी सहकलम ४७(७), ४८(८) महाराष्ट्र

जमीन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार आत्राम, पोहवा हरीदास चाचरकर, पोलीस अंमलदार देवेंद्र बुटले, पंकज सावरे, राहुल देविकार यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**